महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९ वा मजला, नवीन मंत्रालय,
गो. ते. रूग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१

E- mail- medd.shikshan1@gov.in दूरध्वनी-०२२-२२७१९४८१

क्र:एएमसी-२०२२/प्र.क्र.३२५/२२ /शिक्षण-१ दिनांक: २५.१०.२०२४

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
श्री सप्तश्रृंगी शिक्षण संस्था, कमल नगर,
हिरावाडी, पंचवटी, नाशिक.

विषय :- आयुर्वेद अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करिता शासन परवानगीचे नुतनीकरण करणेबाबत.
(श्री सप्तश्रृंगी शिक्षण संस्था, कमल नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक संचलित अंजनेय आयुर्वेद कॉलेज व हॉस्पीटल, सर्व्हे नं.१८६, शिव रोड, मखमलाबाद, नाशिक)

संदर्भ :- १) शासनाचे समक्रमांकाचे ना-हरकत प्रमाणपत्र दिनांक २०.१०.२०२२.
२) समक्रमांकित शासन निर्णय दि.२८.११.२०२३.
३) अध्यक्ष, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली यांचे पत्र.क्र.Ref.No.३-३/ MARB/ २०२४/Ay (१४४), दिनांक ०६.०५.२०२४

श्री सप्तश्रृंगी शिक्षण संस्था, कमल नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक संचलित अंजनेय आयुर्वेद कॉलेज व हॉस्पीटल, सर्व्हे नं.१८६, शिव रोड, मखमलाबाद, नाशिक या संस्थेस उपरोक्त संदर्भ क्र.२ येथिल शासन निर्णयान्वये ९० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमाचे महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर शासन निर्णयानुसार केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी असल्याने सदर शैक्षणिक वर्षात प्रवेशित होणारे विद्यार्थी अंतिम वर्षामध्ये दाखल होईपर्यंत संस्थेने केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक आहे.

२. भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.३ येथिल पत्रान्वये सदर महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी ९० ऐवजी १०० विद्यार्थी प्रवेशित करण्याकरीता परवानगी दिली आहे. सदर परवानगीच्या अनुषंगाने श्री सप्तश्रृंगी शिक्षण संस्था, कमल नगर, हिरावाडी, पंचवटी, नाशिक संचलित अंजनेय आयुर्वेद कॉलेज व हॉस्पीटल, सर्व्हे नं.१८६, शिव रोड, मखमलाबाद, नाशिक या आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता १०० (शंभर) विद्यार्थी प्रवेशित करण्यास संदर्भ क्र.२ येथिल शासन निर्णयान्वये दिलेल्या परवानगीस प्रथम नुतनीकरण प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर प्रकरणी भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये परवानगी देताना नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

२५/१०/२४

(प्रियंका कागिनकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई
२) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
३) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ, नाशिक